# आरती श्री संगणकाची

जय देव जय देव जय श्री संगणका।

क्लिक् क्लिक् मात्रें अवघ्या ह्रसी मम शंका॥ध्रु.॥ जय देव जय देव

तू कठोर, मृदुहि तूचि, किमया तव न्यारी।

भीषण व्हायरस पचवुनि घेशी उदरीं।

मूषक बुध्दीमान तुझ्या समोरीं।

कार्यारंभीं डावा कौल स्वीकारी॥१॥ जय देव जय देव

ऋध्दीसिध्दी तुझिया संगें अवतरती।

गूगल-याहू नामें धारण करिती।

अज्ञानपीडेने त्रस्त जे असती।

विकिपीडीयाने तयां होय मुक्ती॥२॥ जय देव जय देव

इन्फर्मेशन मार्गावरुनी नेशी रे।

खिडक्यांतुनि दावीशी ब्रह्मांड सारें।

पृथ्वीप्रदक्षिणा परमाणूंद्वारें।

सूक्ष्माची कळ उघडी विश्वाचीं दारें॥३॥

करीन यंदा देवा बंगलोरवारी।

आतां पावोनी मजला उध्दारी।

चिकटवी आय् टीच्या नोकरीवरी।

आजन्म घडावी तुझी चाकरी॥४॥ जय देव जय देव

-डॉ. उज्ज्वला हेली दळवी

२८ ऑगस्ट २००९